




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २८ डिसेंबर २०२४ | अंक१९ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## बीड येथील सर्वपक्षीय अक्रोश मोर्चाला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे :- वंचीत आघाडीचे पप्पु गायकवाड

उमापूर (प्रतिनिधी) सरपंच संतोष देशमुख यांच्या सर्व मारेक–यांना तात्काळ आटक करुन फास्टट्राक कोर्टामार्फत सुनावणी घेवुन, मस्साजोग येथील आदर्श सरपंच संतोष देशमुख यांची अमानुषपणे निघृन क्रूर हत्या करणारांना अती कठोर शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी सर्वपक्षीय अक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व बहुजन समाजाने या अंदोलनास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांनी केले. या संदर्भात दि. २५ रोजी गेवराई येथे सर्वपक्षीय महत्वाच्या पदाधिकारी यांची बैठक बोलवण्यात आली होती यावेळी वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका अध्यक्ष मा. अजयकुमार (पप्पू) गायकवाड अवर्जून उपस्थित राहून स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवुन देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी सोबत राहिल तसेच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सर्वपक्षीय अक्रोश मोर्चाला पाठींबा देतोत व गेवराई तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे हजारो कार्यकर्ते यांनी बीडच्या सर्वपक्षीय अक्रोश मोर्चात सहभागी रहावे असे अश्वासन देत कार्यकर्ते पदाधिकारी यांनी या सर्वपक्षीय अक्रोश मोर्चाला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले.

## बापाला न्याय मिळविण्यासाठी लेकीच्या आव्हानाला साथ म्हणून उद्याच्या निषेध महामोर्चात सर्वांनी सहभागी व्हावे – अॅड तुकाराम कागदे

प्रतिनिधी बीड



मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष अण्णा देशमुख यांच्या निर्घृण हत्या करणा=या क्रूर आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी उद्या दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सुभाष रोड मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सर्वपक्षीय, सर्व जातीय, सर्वधर्मीय निषेध महामोर्चा काढण्यात येणार आहे.

तरी एका लेकीच्या बापाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी या निषेध महामोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन अॅड तुकाराम कागदे यांनी केले आहे.


## स्वर्गीय संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी लाखो लोक रस्त्यावर उतरणार.-गणेश वरेकर



बीड प्रतिनिधी मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुखांची हत्या होऊन पंधरा दिवस उलटले.नवीन एसपी बीडमध्ये दाखल झाले. हत्येचा तपास सीआयडी कडे गेला. मुख्यमंत्र्यांनी न्यायाची हमी दिली परंतु अद्याप आरोपी अटक नाहीत. मास्टर माईडचा तपास पोलिसांना घेता आला नाही. आरोपी मोकाट असून तपास कामात होत असलेली दिरंगाई यामुळे संपूर्ण समाजामध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. स्वर्गीय संतोष देशमुखांचे मारेकरी तातडीने अटक करून फाशीच्या शिक्षा करा या मागणीसाठी सर्वपक्षीय महा निषेध मोर्चा आयोजित केला असून जिल्ह्यातील दहशतवाद निपटून काढण्यासाठी जिल्हाभरातून लाखोच्या संख्येने लोक मोर्चात सहभागी होतील. या अन्यायाच्या विरोधातील लढ्यात प्रचंड संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी नाळवंडी जिप गटातील लोकांची बैठक श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आयोजित केली होती. या बैठकीस दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी आवाहन केले आहे.आ.संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार नेते राजेंद्र मस्के,शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख गणेश वरेकर परमेश्वर सातपुते, आदीसह पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.२८ डिसेंबर शनिवार रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून हा महानिषेध मूक मोर्चा निघणार आहे. सर्व जाती धर्मातील सर्व पक्षातील लोक न्यायासाठी या मोर्चात सहभागी होणार आहेत.

# तीहत्या केवळ स्व.संतोष यांची नाही, माणुसकीची सुध्दा झालीये!

### पुन्हा कुणाचा संतोष देशमुख होऊ नये यासाठी शनिवारी मोर्चात सहभागी व्हा




बीड। प्रतिनिधी दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांची हत्या होऊन तब्बल १५ दिवस उलटले आहेत. या गुन्ह्याचा तपास तीन वेगवेगळ्या यंत्रणांकडे गेला तरीही अद्यापपर्यंत आरोपी अटक नाहीत. वारंवार लोकप्रतिनिधी आणि सामान्यांकडून कॉल रेकॉर्डस तपासण्याची मागणी करत असतानाही मुख्य सुत्रधाराला वाचविण्यासाठी असे केले जात नाही. मुख्य सुत्रधार वाल्मीक कराड आहे, हे संपूर्ण जिल्ह्याला माहीती आहे. परंतु ते एका सत्ताधार्याचा उजवा हात असल्याने त्यांना पाठीशी घातले जात आहे. या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि जिल्ह्यात वाढणार्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीडमध्ये शनिवारी (दि.२८) रोजी आयोजित केलेल्या सर्वसमावेशक मूक मोर्चामध्ये सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय हत्या ही केवळ एका व्यक्तीची नव्हे तर अक्षरशः माणुसकीची हत्या आहे. इतक्या क्रुरपणे मारले जाते. एखाद्या चित्रपटात ज्याप्रकारे अतिशयोक्तीपूर्णतेने खलनायक पात्र कोणाला तरी मारत असते त्यापेक्षाही कैक पटीने बिभत्स प्रकारे स्व.संतोष देशमुख यांना मारले जाते. आणि हे इतके गंभीर प्रकरण असताना १५ दिवस उलटूनही या गुन्ह्यातील आरोपी आणि सुत्रधाराला अटक केली जात नसेल, केवळ ते एका सत्ताधाऱ्याच्या राजाश्रयाला असल्यामुळे! किती संतापजनक प्रकार आहे हा! हा प्रकरण म्हणजे केवळ स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचे नाही, तर माणुसकीच्या हत्येचे आहे. त्यामुळे पुन्हा कोणाचा संतोष देशमुख होऊ द्यायचा नसेल तर २८ डिसेंबर रोजी होणार्या सर्वसमावेशक मोर्चात सहभागी व्हा, असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. या मोर्चाला सर्व राजकीय पक्षांचे जेष्ठ नेते, सर्व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि सर्वसामान्य जिल्हावासीय मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

### असा असेल मोर्चाचा मार्ग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाला सुरुवात होईल. त्यानंतर माळीवेस, सुभाष रोडवरून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चाचा मार्ग असेल

### याठिकाणी असेल पार्कींगची व्यवस्था

खंडेश्वरी मंदीराच्या समोरील क्रिडांगण एमआयडीसी परिसर, फटाका मैदान मोंढा रोड परिसर, शासकीय आयटीआय परिसर,जुनी व नवी पंचायत समिती परिसर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड परिसर, माने कॉम्प्लेक्स परिसर, जिल्हा रूग्णालयाच्या मागील बिंदुसरा रेस्ट हाऊस परिसर, निळकंठेश्वर मंदिर परिसर, कनकालेश्वर मंदिर परिसर, बिंदुसरा नदीपात्र परिसर, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसर, छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण परिसर (स्टेडियम), छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) रिलायन्स पेट्रोल पंपाच्या पाठीमागील परिसर.

# जनक्षोभ लक्षात घेता, निरपेक्ष भावनेतून कडक कारवाईची गरज – राजेंद्र मस्के

### सामान्य जनता लाखोच्या संख्येने महानिषेध मूक मोर्चात सामील होतील..!

**( बीड प्रतिनिधी )**

मुख्यमंत्र्यांच्या शब्द आणि कृती मध्ये प्रचंड तफावत असुन, पोलीस अठरा दिवसांत आरोपी अटक करू शकले नाहीत. तर फाशीची शिक्षा कधी मिळणार ? आजही पोलीस कोणाच्या दबावाखाली येऊन काम करत आहेत का हा प्रश्न उपस्थित होतोय. निरापराध सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांची क्रुर हत्या झाली. आरोपींची नावे पुढे आली. मास्टर माईड कोण आहे, याचा वेध जनतेनी घेतला. परंतु आरोपी व मास्टरमाइंड पर्यंत पोलीस पोहचू शकले नाहीत. संतप्त जनतेची भावना शासन जाणीवपूर्वक लक्षात घेत नाही. यामुळे कमालीची चिड निर्माण झाली. मनातील खद खद व असंतोष प्रकट करण्यासाठी जिल्ह्यातील लाखो लोक आज महानिषेध मोर्चाच्या निमित्ताने रस्त्यावर उतरणार आहेत. आरोपींना अटक करण्यास होणारा विलंब राज्य सरकारला नक्कीच परवडणारा नाही. शासनाने जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. सामान्यजनांचा जनक्षोभ लक्षात घेऊन शासनाने निरपेक्ष भावनेतून कडक पाऊल उचलावे, असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले.

संपूर्ण राज्यभर स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येची निंदा चालू आहे. जिल्हाभरातील सामान्य जनता व देशमुख कुटुंबीयांनी आरोपी व मास्टरमाईड यांना तातडीने अटक करा अशी आर्त विनवणी केली जात असताना सुद्धा आरोपींना अटक करण्यास विलंब होत आहे. शासनाचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्मातील, सर्व पक्षातील लोकांनी पुढाकार घेऊन हा महानिषेध मोर्चा आयोजित केला. शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून हा मोर्चा माळीवेसचौक – सुभाष रोड – साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक – बस स्थानक – छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे. अन्यायाला वाचा फोडणा–या या मोर्चात जास्तीत जास्त संखेने जनतेने सहभागी व्हावे ही आग्रहाची विनंती.

## स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी निषेध मोर्च्यात मोठ्या संख्येने उपस्थितीत रहावे:- युवराज मस्के, अॅड.बापूसाहेब जाधव,जयदत्त थोटे, संजय गोडसे

बीड: स्व. संतोष देशमुख यांची ज्या प्रकारे निर्घृण पणे खून करण्यात आला ते पाहता या गुन्ह्यातील आरोपीना मरेपर्यत फाशीची शिक्षा झाली पाहिजे.ही घटना म्हणजे माणुसकीला काळमिा फासणारी आहे.अतिशय निर्दयी पणे स्व. संतोष देशमुख यांना मारण्यात आले आहे.या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी व स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी आज निषेध मुकमोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या मोर्च्यात सर्व समाज बंधवानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवक युवराज मस्के, जयदत्त थोटे, संजय गोडसे, अॅड बापूसाहेब जाधव यांनी केले आहे .

दि. ९ डिसेम्बर रोजी मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय निर्घृणपने हत्या करण्यात आली आहे. आज पंधरादिवस होऊन गेले आहेत तरीही आरोपी अजूनही मोकाटच फिरत आहे. त्यामुळे घटनेतील आरोपीना तात्काळ अटक करून त्यांना शिक्षा देण्यासाठी सर्व समाज बांधवांना विनंती आहे की





आज २८ १२ २०२४ रोजी ११ वाजता बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयवर निघणा–या निषेध मूक मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान मराठा सेवक युवराज मस्के, जयदत्त थोटे, संजय गोडसे, अॅड बापूसाहेब जाधव यांनी केले आहे.

तरी बीड जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी अन्यायाच्या विरुद्ध लढण्यासाठी ताकदिने बीड येथे होणा–या विराट निषेध महामोर्चास उपस्थित रहावे .

# मतदार संघाला सुजलामसुफलाम केल्याशिवाय राहणार नाही

## लोणी गावातील नागरिकांचे माझ्यावर प्रचंड विश्वासाचे नाते–आमदार सुरेश धस

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातून प्रचंड मताधिक्याने निवडून आल्यानंतर अधिवेशन संपल्यावर मतदार संघातील पहिली भेट लोणी गावाला आमदार सुरेश आण्णा धस यांनी दिली. लोणी येथे नूतन विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे बांधकाम पूर्ण होऊन मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी सपत्नीक पूजेसाठी आमदार सुरेश आण्णा धस व सौ. प्राजक्ताताई धस यांना पूजेचा सन्मान ग्रामस्थांच्या वतीने दिला होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन माजी आमदार साहेबरावजी दरेकर नाना हे उपस्थित होते. लोणी येथे जवळपास ४० ते ५० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या भव्य विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या बांधकामाचे आज सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या मंदिरासाठी आमदार धस यांनी दहा लक्ष रुपये त्यांच्या फंडामधून दिले.विधीवत होम हवन झाल्यानंतर विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर जाहीर सभा झाली. पहिल्याच सभेमध्ये आमदार सुरेश आण्णा धस यांनी कोणावरही टीका न करता भविष्यामध्ये फक्त विकासाचे राजकारण करणार आहे अशा प्रकारचा विश्वास व्यक्त केला. लोणी गाव हे नेहमी माझ्याबरोबर राहिलेल्या आहे या निवडणुकीत सुद्धा मला सर्व बाजूंनी घेरलेले लक्षात आल्यामुळे गावातील इतर सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश करून मला १४६२ मते मिळवून दिली. या लोणी गावातील मतदारांच्या विश्वासाला मी पात्र राहण्याचा सदैव प्रयत्न करणार आहे. गावाच्या बाजूने सर्वच रस्त्यांची झालेली दुर्दशा आता संपवणार आहे सर्व रस्ते सिमेंट काँक्रिट,डांबरीकरण करून मजबूत करण्यात येतील. राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी आपले स्नेहपूर्ण संबंध असल्यामुळे विकासाचे कोणतेही काम करताना अडचण येणार नाही असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. पहिल्याच अधिवेशनामध्ये शिंपोरा ते खुंटेफळ तलावा मध्ये येणाऱ्या पाईपलाईन साठी तीनशे कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारकडून करून घेतली आहे. याप्रसंगी आपल्या भाषणामध्ये आमदार धस यांनी सांगितले की लोणी परिसरामध्ये जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली येण्यासाठी सीना नदी मधून खुंटेफळ, (वाटेफळ) लोणी या तलावामध्ये पाईपलाईन द्वारे पाणी आणून टाकण्यात येईल. भातोडी तलावातून वाहून जाणारे पाणी लोणीच्या पाटबंधारे तलावा मध्ये आणून टाकण्यासाठी पाटाचे काँक्रिटीकरण करून देईल. त्याचप्रमाणे गावातील हनुमान मंदिराच्या नूतन बांधकामासाठी माझ्या फंडातील पहिली सही २५ लक्ष रुपयांची लोणी साठी राहील ,असाही शब्द आमदार सुरेश धस यांनी ग्रामस्थांना दिला. याप्रसंगी लोणी ग्रामस्थांच्या वतीने भव्य दिव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते परंतु सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर पद्धतीने हत्या झाल्यामुळे मी सत्कार घेणार नाही असे अण्णांनी स्पष्ट सांगितले. त्याचप्रमाणे संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा होईपर्यंत मी प्रयत्नशील राहणार आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी विठ्ठल रुक्मिणी मंदिर बांधकाम समितीच्या वतीने आमदार सुरेश धस यांना श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्ती व दत्तात्रेयांच्या प्रतिमेची भेट देण्यात आली. याप्रसंगी लोणी गटातील श्री. ह भ प रामदास महाराज रक्ताटे, ह भ प अभिजीत महाराज निंबाळकर, ह भ प नारायण महाराज वाळके, ह भ प बाबा महाराज वाळके, श्री. उद्धव बापू दरेकर,मा. उपसभापती गोपाळ भाऊ रक्ताटे, शिवाजी पाटील वाळके, मोहन तात्या वाळके, पंचायत समिती सदस्य डॉक्टर सुभाष वाळके, गणप्रमुख रामदास अण्णा शेंडगे ,महबूब भाई जवान, श्री राजेंद्र चोभे ,श्री सोमनाथ वाळके, उद्धव पाटील मोडवे ,श्री संजय गुंड, अमोल गुंड, उध्दव पाटील वाळके,जयसिंग गव्हाणे,ह भ प बाळासाहेब बोडरे सर, सरपंच श्री ज्ञानदेव सासवडे सर,संजय रकताटे,बाळासाहेब कावरे, गण प्रमुख श्री राहुल सुरवसे, श्री जालिंदर चांदगुडे नेते, रेनकू आण्णा बेल्हेकर, भवर सर सरपंच,मा.सरपंच श्री.बाजीराव वाळके, सुभाष दादा भोसले,दादा शिंदे,सरपंच राजेंद्र खुरंगे, श्री शरद माखनकर,निवृत्त कर्नल बापूराव पवार,सोमनाथ बेल्हेकर, कृष्णा पवार,विशाल सासवडे,प्रवीण सासवडे,अविनाश खोमणे,मल्हारी भोसले,लोणी ग्रामपंचायत चे सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य,सेवा सोसायटीचे सर्व पदाधिकारी,कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सर्व उपस्थितांचे आभार श्री राजेंद्र (आबा) वाळके यांनी मानले.तर ह भ प रामदास महाराज रक्ताटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी महंत ह भ प श्री. ज्ञानेश्वर माऊली कराळे यांच्या कीर्तन सेवेचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. किर्तन सेवेनंतर महाप्रसादाची पंगत लोणी स .श्री. बाजीराव विठोबा वाळके पाटील यांच्या वतीने देण्यात आली. याप्रसंगी आमदार सुरेश आण्णा धस आमदार झाल्यानंतर मतदार संघात पहिल्यांदाच लोणी या गावी भेट दिल्यामुळे त्यांची ग्रामस्थांनी ढोल ताशाच्या गजरात,फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये भव्य मिरवणूक काढली होती.

# संपादकीय

## मुंबई मराठी माणसांचीच

कल्याणमध्ये एका इमारतीमध्ये राहणाऱ्या दोन अमराठी कुटुंबांतील वाद मिटवायला जाणाऱ्या धीरज देशमुखचा मराठी असण्यावरून केलेला अपमान आणि त्यानंतर बाहेरून माणसे आणून केलेल्या जबर मारहाणीनंतर मराठी आणि अमराठी भाषिक वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कल्याण पश्चिमेकडील योगीधाम परिसरातील अजमेरा हाईट्स या उच्चभ्रू सोसायटीत सरकारी नोकरी करणारे अखिलेश शुक्ला आणि वर्षा कल्वीकट्टे राहतात. अखिलेश यांच्या पत्नी गीता या घराबाहेर देवपूजा करून धूप लावतात. धूप लावल्याने कल्वीकट्टे यांच्या घरात हा धूर जातो. तीन वर्षांच्या बाळाला आणि वयोवृद्ध आईला या धुरामुळे श्वासोच्छ्वासाचा त्रास होतो. ही बाब वर्षा यांनी गीता यांना सांगितली. मात्र गीता यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांच्या बाजूला राहणारे अभिजीत देशमुख आणि धीरज देशमुखने मध्यस्थी केली. धीरजने दोन्ही कुटुंबांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी तुम्ही मराठी लोक भिकारडे आहात. चिकन, मटण खाऊन घाण करता, अशी शेरेबाजी शुक्ला यांच्या पत्नीने केल्याने वादाला वेगळे वळण लागले. त्यांच्या मध्यस्थीचा अखिलेशला राग आला. त्याने बाहेरून १० ते १५ माणसे बोलावून देशमुख आणि कल्वीकट्टे कुटुंबीयांच्या घरात घुसून लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. शुक्लाने केलेल्या मारहाणीत धीरज गंभीर जखमी झाला. त्याच्या डोक्यावर १० टाके पडले. अभिजीत हा सुद्धा जखमी झाला. या घटनेचा व्हीडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाचे वातावरण पसरले. १९ डिसेंबर रोजीच्या घटनेचे पडसाद नागपुरात झालेल्या हिवाळी अधिवेशनातही उमटले. मराठी माणसाचा अपमान आणि मारहाण प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी शुक्लासह त्याच्या सहकाऱ्यांना ताब्यात घेतले असून एमटीडीसीचा कर्मचारी असलेल्या शुक्ला याला निलंबित करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली. मुंबई ही मराठी माणसांची आहे. कुठल्याही परिस्थितीत मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले. एखाद्याने काय खायचे आणि कसे राहायचे, याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे. पण अशाप्रकारे रोखण्याचा कोणालाही अधिकार नाही. या आधारावर भेदभाव मान्य नाही. अशा तक्रारी आल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुंबईत, महाराष्ट्रात राहूनही मराठी माणसांना अतिशय तुच्छ वागणूक देणारे अनेक प्रकार यापूर्वीही घडलेत. मात्र कल्याणमधील प्रकार अक्षरश: कळस होता. मारहाणीच्या घटनेनंतर कल्याणमधील शेकडो नागरिक १९ डिसेंबरच्या रात्री एकत्र जमले आणि शुक्ला यांच्यावर कारवाई करत मराठी कुटुंबाला न्याय देण्याच्या मागणीसाठी अजमेर हाइट्स परिसरात ठिय्या दिला होता. लोकप्रक्षोभामुळे राज्य सरकारने याची तातडीने दखल घेतली तरी स्थानिक पोलिसांची भूमिका संदिग्ध राहिली आहे. अखिलेश शुक्ला हा एमटीडीसीमध्ये अकाऊंटंट आहे. मात्र आयएएस अधिकारी असल्याचे सांगून, मंत्रालयात काम करतो, असे सांगून सोसायटीमधील रहिवाशांना धमकवायचा. खासगी गाडीवर अंबर दिवा लावून फिरायचा, अशी त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. शुक्ला हा पूर्वीपासूनच या परिसरात लोकांना धमकावण्याचे काम करत आहे. महिलांशीही असभ्य वर्तणूक करत असून अनेक सण-उत्सवांमध्ये देखील तो आणि त्याचे कुटुंबीय लोकांशी वाद निर्माण करतात, असे रहिवाशांचे म्हणणे आहे. मागील वर्षी महाशिवरात्रीच्या कार्यक्रमांमध्ये देखील रात्रीच्या वेळी सुरू असलेला अभिषेक कार्यक्रम शुक्ला आणि त्याच्या पत्नीने बंद पाडला होता. आता तर त्याने हद्दच केली. मराठी भाषिकांचा अपमान करताना थेट मराठी माणसांना मारहाण केली. देशमुख कुटुंबीयांना मारहाण केल्यानंतरही त्याची अरेरावी दिसून आली. माझे तुम्ही काहीही करू शकणार नाही. माझी वरपर्यंत ओळख आहे. मंत्रालयातून एक फोन येईल, अशी धमकी सर्वांना दिली होती. स्थानिक पोलिसांचे अभय असल्यानेच शुक्ला मनमानी पद्धतीने वागत होता. काही अधिकारी त्याला मदत करत होते. सदर घटनेनंतर शुक्ला हा कुटुंबासह घर बंद करून बाहेरगावी गेला. दोन-तीन दिवस तो फरार होता. त्याला अटक करण्यात पोलिसांनी दिरंगाई केली. त्यामुळे पोलीस अधिकच अडचणीत आले. पोलिसांची भूमिका संशयास्पद आहेच. तरीही त्यांनी सारवासारव करून कल्याण प्रकरणात आपला सहभाग नसल्याचे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. मराठी कुटुंबाला मारहाण प्रकरणी आम्ही कारवाई करत आहोत. कुणालाही सोडणार नाही. दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याप्रमाणे चौकशी करून दोषींवर कारवाई करू, या प्रकरणाचा पुढील तपास एसीपी करत आहेत, असे खडकपाडा पोलिसांतर्फे सांगण्यात आले. तक्रार दाखल करवून घेण्यास दिरंगाई करणारा पोलीस अधिकारी लांडगे याच्याविरुद्ध अनेक

# शासन दफ्तरी गुन्हे नोंद असणा-यांचा शस्त्र परवाना रद्द करा ; जिल्हाधिका-यांमार्फत गृहमंत्र्यांना सामाजिक कार्यकर्त्यांचे निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२७ ) बीड जिल्ह्यात १२८१ शस्त्र परवाना धारकांपैकी २४५ जणांवर एक किंवा एकापेक्षा जास्त गंभीर गुन्हे असल्याची पोलिस ठाण्यात नोंद असुन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाळुमाफिया,अपहरण,खुन, खंडणी, मटका बहाद्दर , गोळीबार या सारखे गंभीर गुन्ह्यांची शासन दफ्तरी नोंद असलेल्या शस्त्र परवाना धारकांचे परवाने रद्द करण्यात यावेत तसेच तत्कालीन पोलीस अधीक्षक बीड अविनाश बारगळ यांनी गुन्हा नोंद असलेल्या २४५ शस्त्र परवाना धारकांची जिल्हा विशेष शाखेकडून माहिती घेऊन जिल्हाधिका-यांना ऑक्टोबर मध्येच पाठवली होती. त्यावर तातडीने निर्णय घेऊन शस्त्र परवाने रद्द करावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर, राम नाथ खोड, शेख युनुस च-हाटकर , शेख मुबीन,रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक), माजी सैनिक बीड जिल्हाध्यक्ष आप, नितिन सोनावणे बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना लेखी निवेदनाद्वारे केली असून सोमवारी आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

सविस्तर माहितीस्तव

बीड जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते आक्टोबर २०२४ या गेल्या १० महिन्यात ३६ खुन, खुन करण्याचा प्रयत्न केल्याच्या १६८ तसेच गर्दी करून मारामारी करणे,दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे तसेच यापैकी ७ गुन्हे अजुनही उघड झालेले नाहीत. शिवाय बीड जिल्ह्यातील महिला ,मुली




सुरक्षित नसुन १५६ अत्याचाराच्या घटना तर विनयभंग , छेडछाडीच्या ३८६ घटना घडल्याची पोलिस दरबारी नोंद आहे.बीड जिल्ह्यात सद्यस्थितीत १२८१ जणांकडे शस्त्र परवाना आहे. प्रत्येक परवाना देताना पोलिसांकडून संबंधित अर्जदाराची शहानिशा केली जाते.त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का??याची माहिती घेतली जाते. परंतु मागणी काही वर्षांत पोलिसांनी दुर्लक्ष केले आहे त्यामुळे जिल्ह्यात ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत आणि ज्यांनी परवाना घेतल्यावरही गुन्हे करणे सुरूच ठेवले आहे अशांकडेही शस्त्र परवाना ठेवला आहे.

तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी कमीत कमी १ आणि जास्तीत जास्त १६ गुन्हे दाखल असलेल्या २४५ जणांची जिल्हा विशेष शाखेकडून माहिती घेऊन जिल्हाधिका-यांना आक्टोबर मध्ये पाठवली होती.आता डिसेंबर संपत आलाय तरीही जिल्हाधिका-यांकडुन यावर काहीच कारवाई झालेली नाही. दरम्यान सावकार, खंडणीखोर गुन्हेगार, राजकीय नेते यांच्याकडे बंदुक परवाने आहेत.

शस्त्र परवाना देण्यासाठी पुढारी व आधिका-यांचीच लॉबी सक्रिय

बीडमध्ये २०२१ मध्ये बीड जिल्ह्यात १०९८ परवाना धारक होते.२०२४ पर्यंत हि संख्या १२८१ पर्यंत जाऊन पोहोचली. म्हणजे या ४ वर्षाच्या कालावधीत १८३ परवाने वाटप केले गेले.पोलिस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन परवाना मिळवून देण्यात बीड जिल्ह्यातील मोठ्या आधिका-यांचीच लॉबी सक्रिय असुन आम दार आणि खासदार यांनी केलेल्या शिफारशीनंतर ५ ते १० लाख रुपयात शस्त्र परवाना मिळवल्याचे बोलले जाते.

एकुण शस्त्र परवाने १२८१ आणि गुन्हे दाखल असलेल्या दिलेले परवाने --

१ गुन्हा असलेले १५५
२ गुन्हे असललेले ४०
३ गुन्हे असलेले २०
४ गुन्हे असलेले १७
५ गुन्हे असलेले ३
६ गुन्हे असलेले ५
९ गुन्हे असलेले १
१० गुन्हे असलेला १
१२ गुन्हे असलेला १
१४ गुन्हे असलेला १
१६ गुन्हे असलेला १

जिल्हाधिका-यांनी २९५ प्रस्ताव फ ` टाळले

जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव पाठविण्याआधी पोलिसांकडून त्याची खातरजमा केली होती. हे सर्व करून पाठविलेले २९५ प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयातुन नाकारण्यात आले आहेत.हे प्रस्ताव आगस्ट २०२३ पुर्वीचे असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे पोलिस प्रशासनावरही संशय व्यक्त होत असुन दुस-या बाजूला २४५ परवाने रद्द करण्याचा प्रस्तावर जिल्हाधिका-यांकडून निर्णय घेतला जात नाही त्यामुळे महसूल विभागही संशयाच्या भोव-यात असल्याचे दिसून येते.

# एका अध्यायाला पूर्णविराम

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. श्याम बेनेगल हे बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीची न भरून येणारी हानी झाली आहे. बेनेगल यांना भारत सरकारने १९७६ मध्ये पद्मश्री आणि १९९१ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. श्याम बेनेगल हे चित्रपटसृष्टीतील दिग्गज दिग्दर्शक होते. त्यांनी अनेक गाजलेल्या मालिका टेलिव्हिजनला दिल्या. बेनेगल यांना भारत सरकारने १९७६ ते १९९१ सालामध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. आपल्या वेगळ्या धाटणीच्या दिग्दर्शनासाठी ओळखल्या गेलेल्या श्याम बेनेगल यांची ओळख काही भारतापुरती सीमित नाही, तर जगभरातील विविध मानाच्या चित्रपट महोत्सवांमध्ये त्यांचे चित्रपट दाखवले गेले आहेत. दादासाहेब फाळके यांनी भारतामध्ये सिनेमांची मुहुर्तमेढ रोवली आणि भारतीय चित्रपटांचा प्रवास सुरू झाला. सुरुवातीला आध्यात्मिक आणि मनोरंजनावर आधारित चित्रपटांचा प्रवास सुरू झाला. यानंतर काही स्वातंत्र्य चळवळीला चालना देणारे आणि सामाजिक वास्तव दाखविणारे सिनेमेही येऊ लागले. पण पुढे चित्रपटामध्ये मुख्यत्वे मनोरंजन हा एकच बाज कायम राहिला आणि प्रेक्षकांनीही त्याला डोक्यावर घेतले. पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात सामाजिक भान देणारी आणि वास्तववादी चित्रपटे येत होती. सत्यजीत रे, बिमल रॉय, व्ही. शांताराम, गुरु दत्त, कैफी आजमी, बलराज सहानी या सारख्या दिग्दर्शक आणि कलाकारांनी आपल्या चित्रपटांतून समाजाचे वास्तव समोर आणणे चालू ठेवले होते, पण यानंतर ७०-८० च्या दशकात शाम बेनेगलसारखा तरुण दिग्दर्शक येऊन अशा सामाजिक चित्रपटांना नवा आयाम देत समांतर चित्रपटांची चळवळच सुरू केली. मनोरंजनावर आधारलेल्या प्रस्तापित सिनेमांना छेद देत बेनेगल यांनी समांतर चित्रपटांच्या युगास प्रारंभ केला. भारतामध्ये ज्या दिग्दर्शकांनी समांतर चित्रपटाची चळवळ सुरू केली त्यामध्ये श्याम बेनेगल यांचे नाव आघाडीने घ्यावे लागेल. चित्रपट हाच ध्यास आणि चित्रपट हाच श्वास या ध्येयाने श्याम बेनेगल यांनी या क्षेत्रामध्ये आपल्या नावाचा वेगळा ठसा उमटविला. सुरुवातीला शाम बेनेगल यांची उसकी रोटी, भुवन शोम, सारा आकाश या सारखी चित्रपटे आली होती. पण, ङ्गअंकुरफ हा चित्रपट माईल स्टोन ठरला आणि समांतर चित्रपटांची मुहुर्तमेढ रोवली गेली. या समांतर चित्रपटांमध्ये कोणी निर्माता पैसे गुंतविण्यास तयार होत नसत. म्हणून असे चित्रपट बनविण्यासाठी राष्ट्रीय चित्रपट फायनान्स महामंडळाकडे जावे लागे. आता सरकार चित्रपट बनविण्यासाठी पैसे देणार म्हटल्यावर त्यामध्ये हस्तक्षेपही आलाच. म्हणून शाम बेनेगल यांनी आपले चित्रपट स्वत: बनविण्यासाठी जाहिरात संस्था काढली. जाहिरात बनवून आलेला पैसा ते चित्रपटांमध्ये गुंतवत असत. ङ्गअंकूरफ, ङ्गनिशांतफ, ङ्गभूमिकाफ ही चित्रपटे त्यांनी या पद्धतीने बनवली. यानंतर त्यांनी काही सहकारी संस्थांकडून मदत घेऊन ङ्गआरोहनफ, ङ्गसुसमनफ आणि ङ्गअंतर्नादफ सारखी चित्रपटे निर्माण केली. श्याम बेनेगल यांच्या जाण्याने भारतातील समांतर चित्रपट क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. नुकताच त्यांनी ९०वा वाढदिवस साजरा केला. अभिनेत्री शबाना आझमी यांनी याबाबत त्यांच्या इंस्टाग्रामवर वाढदिवसाच्या पार्टीचे फोटो शेअर केले होते. श्याम बेनेगल यांचा जन्म १४ डिसेंबर १९३४ मध्ये सिकंदराबाद येथे झाला. कॉपी रायटर म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. नंतर आपल्या मेहनतीने आणि कामाच्या जोरावर त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत मोठे स्थान मिळवले. हिंदी चित्रपटसृष्टीतील त्यांचे योगदान विसरता येणार नाही. श्याम बेनेगल यांनी १९७४ मध्ये त्यांच्या चित्रपट दिग्दर्शनाची सुरुवात केली. ङ्गअंकुरफ नावाच्या चित्रपटाची त्यांनी निर्मिती केली. हा त्यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला पहिला चित्रपट होता. १९८६ मध्ये त्यांनी टीव्हीच्या दुनियेतही प्रवेश केला. त्यांनी ङ्गयात्राफ ही मालिका दिग्दर्शित केली. त्याच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये ङ्गनिशांतफ, ङ्गमंथनफ, ङ्गभूमिकाफ, ङ्गमंडीफ, ङ्गकोंडुराफसारख्या अनेक चित्रपटांचा समावेश आहे. केवळ चित्रपटच नाही तर ङ्गभारत एक खोजफ सारखी मालिका असो किंवा संविधानाच्या निर्मितीवर तयार केलेला माहितीपट असो या सगळ्याला अभ्यासकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. जगभरातील चित्रपट विषयक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थांमध्ये श्याम बेनेगल यांचे नाव अगत्याने घेतले जाते. तिथे त्यांचे चित्रपट अभ्यासक्रमाचा भाग आहेत.

# चाळीस वर्षाच्या संघर्षाचे फलित ३१ डिसेंबरला राजुरी तर मार्चमध्ये बीड वडवणी पर्यंत धावणार रेल्वे इंजिन

बीड। प्रतिनिधी

अहमदनगर बीड परळी या २४०.८३ किमीचा मार्ग ९५ गावातून जात आहे सन १९ ८३ पासून बीडकरांची रेल्वेची मागणी रेल्वे आंदोलन कृती समितीच्या वतीने स्व.कॉ. अत्तर बाबर, स्व.देशभुषणजी जैन, स्व. मदनलाल सारडा, माजी खा.स्व. द्वारकादास मंत्री नंतर माजी खा.स्व.केशर काकू क्षीरसागर, स्व.बन्सीधरराव जाधव स्व.नामदेवराव क्षीरसागर आणि त्यानंतर तत्कालीन लोकप्रतिनिधींनी लावून धरल्याम ुळे या लढ्याला आता यश येताना दिसत आहे ३१ डिसेंबर रोजी राजुरी पर्यंत चे काम पूर्ण झाल्याने त्यावर इंजिनची चाचणी होणार आहे तसे पत्र रेल्वे आणि जिल्हा प्रशासनाने देखील काढले आहे तर मार्चपर्यंत (२०२५ )बीड आणि वडवणीला नवीन वर्षात रेल्वे इंजिन धावणार असल्याचे दिसत आहे एकंदरीत रेल्वेच्या आंदोलनाचे हे४० वर्षाचे फलितच म्हणावे.

अगदी १९७२ च्या दरम्यान त्याकाळचे बीडचे नगराध्यक्ष कॉ. अत्तर बाबर यांनी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या म ागणीला हि मागणी आपली आणि जिल्ह्याची आहे म्हणून त्यांनी याच मागणीसाठी जिल्हा बंदची हाक दिली होती त्याला प्रतिसाद मि ळाला.त्यावेळी स्व.द्वारकादासजी मंत्री यांची देखील साथ मिळाली त्यानंतर स्व.केशर काकू यांनी हीच मागणी पुढे देशाच्या सभागृहात मांडली आम्हालोल्वे हवी आहे म्हणून आणि त्यावेळी हि मागणी लोकांना काहीच समजत नसली तरी कालानुरूप याच रेल्वेची मागणी जिल्ह्यातील नागरिक करू लागला स्व. काकू नंतर लोकप्रतिनिधी खा.रजनीताई पाटील स्व.गोपीनाथराव मुंडे यांनीही हीच मागणी केली पण हामार्ग करायचा कसा हा प्रश्न शासनासमोर उभा राहिला त्यावेळी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे म ागणी आंदोलन समितीचे निमंत्रक स्व. नाम देवराव क्षीरसागर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख याना शिष्टमंडसह भेटून माहिती दिली त्यावेळी तत्कालीन मंत्री जयदत्त क्षीरसागर, तत्कालीन मंत्री स्व.विम लताई मुंदडा, तत्कालीन महसूल राज्यमंत्री प्रकाश सोळंके यांच्या मदतीने थेट लातूर गाठत या मार्गावर निर्णय घ्यायला लावला तो म्हणजे राज्य शासन आणि केंद्र शासन या मार्गासाठी अर्धा अर्धा खर्च करायला तयार आहे हा ऐतिहासिक निर्णय स्व. विलासराव देशमुख यांच्या काळात झाला पुढे खा.प्रीतम ताई मुंडे, माजी मंत्री पंकजा मुंडे सह या सर्वांनीच या रेल्वेसाठी प्रशासकीय पातळीवर हातभार लावला आणि जनतेची मागणी म्हणत स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन कृती समिती यांनी रेल्वे साठी मोठे जन आंदोलन उभे केले त्यातच स्व.अमोल गलधार यांनी युवा संघर्ष समिती देखील या रेल्वे आंदोलनामध्ये उतरल्याने त्याला व्यापक स्वरूप आले आणि स्व.गोपीनाथ मुंडे यांनी हा प्रश्न जिव्हाळ्याचा केला त्यापूर्वी सर्वात प्रथम स्व. काकू यांनी देशाच्या सभागृहांमध्ये बीडच्या रेल्वेची मागणी केली हा रेल्वे मार्ग तोट्यात असला तरी जिल्ह्यातील जनभावना आणि या रेल्वेमुळे होणारा विकास पाहता या रेल्वे मार्गाला तत्त्वतः मान्यता देण्यात आली मात्र त्यानंतर रखडलेले हे काम पुन्हा सुरू करण्यासाठी पुन्हा जनरेटा सुरू झाला,या कामासाठी आ. सुरेश धस देखील मागे राहिले नाहीत त्याकाळी जिल्हाधिकारी नंदकुमार जंत्रे ,भारत सासणे, सदानंद कोचे यांचे सकारात्मक भूमिका कामी आली पण रेल्वे येत का नाही म्हणून जिल्हाभरात मोठम ोठी आंदोलने झाली केंद्राच्या आकाशवाणी असो की दूरसंचार विभाग यावर आंदोलन करण्याचे काम युवा संघर्ष समितीने केले रस्ता रोको आंदोलन केली तर रेल्वे साठी स्वातंत्र्यसैनिक रेल्वे समितीने कागदोपत्री पाठपुरावा करत याला बळ मिळाल्याने पुढे हा तोट्यातील रेल्वे मार्ग करायचा कसा यावर विचार विनिमय होऊन तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केंद्र आणि राज्य सरकार ५०% भागीदारीमध्ये हा मार्ग पूर्ण करेल असा निर्णय घेतला आणि या मार्गाला सुरुवात झाली प्रारंभी नारायणडोह पर्यंत काम झाले तेही बरेच दिवस रखडले होते परंतु पुढे पुन्हा स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन समितीचे निमंत्रक स्व. नामदेव क्षीरसागर यांच्यासह त्यांचे सर्व समिती सदस्यांनी लोकप्रतिनिधी कडे पाठपुरावा करून रेल्वे आलीच पाहिजे हा हट्ट धरला त्यानंतर पुन्हा केंद्राने यावर हळूहळू करत बजेट सुरू केले आणि आता विघनवाडी पर्यंत हा मार्ग पूर्ण झाला मध्यंतरी आष्टी ते नगर रेल्वेच्या काही फेऱ्या सुरू होत्या परंतु तोट्यात येत असल्यामुळे ती बंद करण्यात आली आता पुढे विघनवाडी पर्यंत काम पूर्ण झाले आहे विघनवाडी पर्यंतही रेल्वे इंजिन चाचणी यशस्वी झाली आहे आता पुढील कामासाठी राजुरी पर्यंत काम पूर्ण झाले असून जिल्हा प्रशासनाने आणि केंद्राच्या रेल्वे विभागाने दिलेल्या पत्रानुसार ३० व ३१ डिसेंबर रोजी सकाळी दहा ते चार वाजेपर्यंत विघनवाडी ते राजुरी दरम्यानच्या रेल्वे ट्रॅकवर रेल्वे इंजिनची चाचणी केली जाणार आहे तर नव्या वर्षांमध्ये म्हणजे २०२५ मध्ये मार्च महिन्यात हीच रेल्वेची चाचणी बीड आणि पुढे वडवणी पर्यंत होण्याची शक्यता रेल्वे अधिर्कायांनी व्यक्त केली आहे त्यानुसार तातडीने कामे सुरू आहेत पुलाचे आणि भूसंपादनाचे किरकोळ कामे वगळली तर कामाला गती आहे वडवणी येथील रेल्वे स्थानक देखील पूर्ण झाले आहे येत्या तीन महिन्यांमध्ये हे काम पूर्ण होऊन बीड आणि पुढे वडवणी पर्यंत रेल्वे इंजिनची चाचणी घेतली जाईल बीड पर्यंत रेल्वे चाचणी पूर्ण झाल्यानंतर बीड ते अहमदनगर रेल्वे सेवा सुरू होण्याची शक्यता आहे प्रामुख्याने परळी कडून वडवणी पर्यंत रेल्वे पटरी चे काम सुरू आहेत तेही काम आता जलद गतीने होत असल्याने बिडकर यांचे अनेक वर्षाचे रेल्वेचे स्वप्न पूर्णत्वास येत असल्याचे दिसत आहे.

### रेल्वे मागणी लढ्यातील या शिलेदाराने प्रश्न लावून धरला

सन १९८३-८४ पासून स्व अत्तर बाबर नगराध्यक्ष असतानाही समिती सदस्याप्रम ाणे स्व.द्वारकादास मंत्री, स्व.केशर काकू क्षीरसागर नंतर स्वतंत्र सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे मदनलालजी सारडा, देशभूषण जैन यांच्या अध्यक्षतेखाली ही चळवळ सुरू झाली त्यांच्या निधनानंतर बन्सीधर जाधव समितीचे अध्यक्ष, समिती निमंत्रक स्व. नामदेवराव (दादा) क्षीरसागर, स्व.अर्जून जाहेर पाटील, स्व. हिरालालजी सारदा, सदस्य सत्यनारायण लाहोटी, नटवरलाल बुद्धदेव जवाहरलाल सारडा, स्व. स्वातंत्र सैनिक किसनराव गायके, स्व. बाजिराव वाकुडे, स्व. स्वातंत्र्य सैनिक लांडे, मन्मथ अप्पा हेरकर,शांतीलाल पटेल . सुरेश मेखे, किसान गायके,रमेश घोलप ,सय्यद नवदुजमा, महम्मद लईक भाई, मंगेश लोळगे, विलास बडगे ,वाय जनार्धनराव ,अरुण डाके, जाधव,राम जोशी,मनमोहन कलंत्री ,डॉ अरुण भस्मे ,गोविंद कासट,विष्णुदास बियाणी, आणि यांच्या जोडीला स्व.अमोल गलधर यांची युवा संघर्ष समिती प्रा.सुशिला मोराळे, मा.जी आ.राजेंद्र जगताप यांच्या नियमित पाठपुरावा व रेल्वेच्या मागणीसाठी आंदोलन केले यात लोकप्रतिनिधींची मिळत असलेली मदत यावरून नगर बीड परळी रेल्वे ट्रॅकवर आल्याचे दिसते.

### स्व.क्षीरसागर (दादा) विघनवाडी पर्यंतचे साक्षीदार

गुरुवार दिनांक १६ डिसेंबर २१ रोजी स्वतंत्र सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे निमंत्रक स्व नामदेवराव क्षीरसागर यांनी नगर येथील मुख्य अभियंता (निर्माण) विजयकुम ार राव यांची भेट घेतली त्यावेळी केवळ नारायणडोह पर्यंतचे काम झाले होते पुढील अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी स्वतः हून पालकमंत्री जिल्हाधिकारी भूसंपादन अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला त्यांच्या समवेत स्वतंत्र सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे पदाधिकारी देखील होते त्यानंतर विघनवाडी पर्यंतचा मार्ग विना अडथळा झाला अनेक शेतर्कयाच्या अडचणी थेट स्पॉटवर जाऊन सोडवल्या त्यासाठी तत्कालीन खा प्रितमताई मुंडे यांचे मोठे सहकार्य लाभले होते.पण पुढे दर्दैवाने स्व नामदेवराव क्षीरसागर यांचे निधन झाल.

----------

### भु संपादनाचा गतिरोधक दूर करण्याची गरज

अहमदनगर-बीड-परळी या नियोजित रेल्वेसाठी जिल्ह्यातील जनता रेल्वे कधी धावणार याकडे आतुरतेने पहात असून रेल्वेचे नगर ते विघनवाडी पर्यंतचे ट्रेक व चाचणी पूर्ण झाली आता राजुरी ते बीड स्थानक काम सुरू आहे रेल्वे स्टेशनचा उभारणी पूर्ण झाली असून काही ठिकाणी भूसंपादनाची कामे प्रलचित असल्याने त्याला पाहिजे तेव्हडी गती मिळत नाही जर भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली तर कामाला अधिक गती येईल कारण अनेक ठिकाणी कारण नसताना काम बंद करणे काही ठिकाणी मावेजच्या मागणीसाठी अडवाआडवी करणे यासाठी प्रशासन आणि शेतर्कयाच्या सहकार्याची अपेक्षा रेल्वे प्रशासनाकडून व्यक्त केली जात आहे.

-----------

# ५ जानेवारी ला होणारी एमपीएससी ची परीक्षा २ फेब्रुवारी २०२५ ला होणार

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

बीड : दि. २७: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने दिनांक ०५.०१.२०२५ रोजी नियोजित महाराष्ट्र गट–ब अराजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा–२०२४ होणार होती मात्र शासनाद्वारे शुध्दी पत्रक काढून ही परीक्षा दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर परीक्षेसाठी समन्वय अधिकारी, पर्यवेक्षक, समवेक्षक, लिपोक, शिपाई यांचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि, शुद्धिपत्रकानुसार दिनांक ०५.०१.२०२५ रोजी घेण्यात येणारी महाराष्ट्र गट–ब अराजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा–२०२४ या परीक्षेच्या दिनांकात बदल करून सदरील परीक्षा ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात येईल.

त्यानुषंगाने सदरील परीक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, आदेशान्वये सदरील परीक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या नेमणुका पुढील नियोजित दिनांकास होणा–या महाराष्ट्र गट–ब अराजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा–२०२४ या परीक्षेसाठी कायम ठेवण्यात येत आहेत. तसेच दिनांक २७.१२.२०२४ रोजी आयोजित केलेले प्रशिक्षण रद्द झाले आहे. पुढील प्रशिक्षणाचा दिनांक यथावकाश कळविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

*****

# ४०० अंमलदार, ४ डीवायएसपी तैनात,बीडच्या मोर्चासाठी पोलीस प्रशासनाची फिल्डिंग

बीड। प्रतिनिधी मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी शनिवारी बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेते आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे हे सहभागी होणार आहेत. या मोर्चात आजुबाजूच्या तब्बल ५० गावांमधील नागरिक सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार किंवा घटना टाळण्यासाठी बीडमध्ये पोलीस प्रशासनाकडून चोख तयारी करण्यात आली आहे. बीडमधील सर्वपक्षीय मोर्चासाठी संपूर्ण शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त असेल. त्यासाठी शहरात ४०० अंमलदार, वाहतुकीचे ७० अंमलदार, वरिष्ठ अधिकारी ४ पोलीस उपाधीक्षक, इन्चार्ज ऑफिसर, एक अतिरिक्त पोलीस अधीक्षक तैनात असतील. या सर्व अधिकाऱ्यांच्या नेतृत्त्वाखाली याव्यतिरिक्त दंगल नियंत्रण पथक अर्थात आरसीपीची ६ पथके, राज्या राखीव पोलीस दलाच्या २ एसआरपीएफ कंपनी आणि अधिक अतिरिक्त बंदोबस्त असणार आहे. या मोर्चामुळे बीड शहरातील वाहतुकीतही बदल करण्यात आला आहे. ज्या मार्गावरुन मोर्चा जाणार आहे, तिथे विशेष खबरदारी बाळगण्यात येणार आहे. मोर्चा ज्या भागातून जाईल तेथील इमारतींवर नजर ठेवली जाणार आहे. या मोर्चात वाहनांना प्रवेश देऊ नये, पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस दलाकडून मोर्चेकऱ्यांना करण्यात आल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिली. दरम्यान सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाचा तपास सीआयडी कडे वर्ग करण्यात आल्याने याबाबतची अधिक माहिती सीआयडीच्या माध्यमातून दिली जाईल असे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी सांगितले आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणातील मारेकऱ्यांना पकडण्यासाठीचा सरकारवरील दबाव वाढला आहे. त्यामुळे बीडमध्ये पोलीस प्रशासनाच्या हालचालींना वेग आला आहे. सीआयडीचे महासंचालक प्रशांत बोरुडे यांच्याकडून हत्याप्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याची चौकशी केली जात आहे. सलग दुसऱ्या दिवशी सीआयडीचे अप्पर पोलीस महासंचालक बीडमध्ये तळ ठोकून आहेत. कालच प्रशांत बोरुडे यांनी बीडमधील पोलीस अधिकाऱ्यांकडून याप्रकरणाची माहिती घेतली होती. यानंतर आज दुसऱ्या दिवशीही सीआयडीचे अप्पर पोलीस महासंचालक प्रशांत बोरुडे बीड शहर पोलीस स्टेशनमधून तपासाची सूत्रे हाताळत आहेत.

# लोकसंस्कृतीचा आविष्कार माळेगाव यात्रा !

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून ओळखली जाणारी माळेगाव यात्रा लोहा तालुक्यातील माळेगाव येथे दरवर्षी मार्गशिष महिन्यात भरते. यावर्षी ही यात्रा रविवार २९ डिसेंबर ते २ जानेवारी २०२५ या पाच दिवसाच्या कालावधीत भरणार आहे. गेल्या काही वर्षात नांदेड व लातूर जिल्हा प्रशासनाने यामध्ये आपला सहभाग वाढवला आहे. नांदेड जिल्हा परिषद, लोहा पंचायत समिती आणि माळेगाव ग्रामपंचायत या यात्रेचे आयोजन करते. महाराष्ट्राची वैभवसंपन्न परंपरा जपणारी व मराठवाडयाचे ऐतिहासिक महत्व जतन करणारी श्रीक्षेत्र खंडोबारायाची ही यात्रा नांदेड ते लातूर महामार्गावरील माळेगाव या गावी भरते. माळेगाव येथे मुख्य मंदिरात खंडोबा आणि म्हाळसा यांचे चांदीचे मुखवटे आहेत. हजारो वर्षापूर्वीच्या हेमाडपंथी मंदिरातील महादेवाचे रुप म्हणजे खंडोबा याठिकाणी दर्शनासाठी विराजमान आहेत. लाकडी देवघर चांदीच्या पत्र्याने मढविलेले आहे. श्रीक्षेत्र माळेगाव येथील नागरिकांचे ग्रामदैवत मल्हारी म्हाळसाकांत खंडोबा असून अनेक जणांचे खंडोबा हे कुलदैवतही आहे. या यात्रेच्या निमित्ताने देशाभरातून विविध भागातून सर्व जातीधर्माचे लोक येथे येतात.

याठिकाणी सांस्कृतिक ऐक्याचे, एकात्मतेने नटलेल्या विविधतेचे दर्शन पाहावयास मिळते. याठिकाणी मोठे–मोठे आकाश पाळणे सर्वांचे आकर्षण असून अनेक हौशी यात्रेकरु याचा आनंद घेतात. याठिकाणी जिल्हा परिषदेच्यावतीने विविध माहिती प्रदर्शने, कृषी प्रदर्शने, आरोग्य शिबिर, खाद्य पदार्थाचे महोत्सव भरविले जातात. या यात्रेला शेकडो वर्षांची परंपरा असल्याने येथील विविध शर्यती, प्रदर्शन, कुस्त्यांची दंगल, लोककला, संगीत वाद्य, लोकनाटक असा समृद्ध मराठी लोककला संस्कृतीचा अविष्कार पाहायला मिळतो. यात्रा ही जवळपास एक महिनाभर चालते. यात इथला जनावराचा बाजार हा सर्वदूर ओळखला जातो. यात घोडे, उंट, गाय, बैल, म्हैस, रेडे, गाढव, शेळया, मेंढया, कुत्रे आदी पशु पक्षी इतर राज्यातूनही लोक घेवून येतात. मागील तीन ते चार वर्षापासून माळेगाव यात्रेत श्वानांची खरेदी विक्रीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या नांदेडच्या भागात आणि लातूर जिल्ह्यात आढळणारा कारवान आणि पश्मी जातीच्या श्वानाची पसंती वाढली आहे. त्याचबरोबर लाब्राडोर, डोबरमन आणि जर्मन शेफर्ड जातीच्या श्वानांना पण मोठया प्रमाणात पसंती दिली जात आहे.

यावर्षी २९ डिसेंबर ते २ जानेवारी २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत माळेगाव यात्रा भरणार असून २९ डिसेंबर रोजी यात्रेच्या पहिल्या दिवशी देवस्वारी व पालखी पूजन, महिला व बालकांसाठी स्पर्धा, भव्य कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन व कृषिनिष्ठ शेतक–ंचा सत्कार जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येणार आहे. दुस–या दिवशी अश्व, श्वान, कुकूट प्रदर्शन व विविध स्पर्धांचे उदघाटन व महिला आरोग्य शिबिर होणार आहे. तीस–या दिवशी कुस्त्यांची दंगल, चौथ्या दिवशी शंकरपट बैल गाडा शर्यत, पारंपारिक लोककला महोत्सव, २ जानेवारी पाचव्या दिवशी सकाळी ११ वाजता पशुसंवर्धन विभागाचे बक्षिस वितरण, दुपारी ३ वाजता लावणी महोत्सव असे सर्व कार्यक्रमाचे जिल्हा परिषदेकडून नियोजन करण्यात आलेले आहे. स्थानिक परंपरेनुसार मल्लांना आणि लोककलेला प्रोत्साहन देण्यासाठी कला व लावणी महोत्सव आणि कुस्त्यांच्या दंगली, शंकरपट आयोजित केले जातात. कुस्त्यांच्या आखाडयातील फड जिंकणा–या मल्लास रोख बक्षिसाबरोबर सन्मानाचा फेटा बांधून गौरविण्यात येते.

या यात्रेचे नियोजन दरवर्षी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येते. याही वर्षी यात्रेचे उत्तम नियोजन केले असून यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे. सर्व विभागांना करावयाच्या उपाययोजनेबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक विभागाने आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण केली असून यात्रा उत्तमरित्या पार पाडण्यासाठी सुयोग्य नियोजन केले आहे.

# डिसेंबर व जानेवारीमध्ये डीबीटीव्दारे श्रावणबाळ / संजयगांधी योजनेचे अनुदान मिळणार

बीड, (जिमाका) दि. २७ : राज्य शासनाच्या श्रावणबाळ/ संजयगांधी योजनेचे अनुदान वितरण हे माहे डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ चे अर्थसहाय्य थेट लाभ हस्तांतरण (उ्ढ्ढ) द्वारे वितरीत करण्यात येणार आहे. उर्वरीत लाभार्थ्यांनी यांना पूर्वीच्याच पारंपारीक पध्दतीने बिम्स मार्फतच देण्यात येणार आहे. परंतु सदर योजनेचे माहे फेब्रुवारी २०२५ पासूनचे अर्थसहाय्य केवळ डीबीटी पोर्टलवर आधार व्हॉलिडेट असणा–या लाभार्थीयांनाच वितरीत करण्यात येणार आहे तर उर्वरित आधार व्हॉलिडेट नसलेल्या तसेच डीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी न केलेल्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य माहे फेब्रुवारी २०२५ पासून बंद करण्यात येणार आहे यांची लाभार्थ्यांनी नोदं घ्यावी,असे तहसीलदार कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

सदर डीबीटी पोर्टलवर नोंदणी करणे करीता लाभाथी यांचे खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:–

डिबीटी करणेकरीताचा विहीत नमुन्यातील अर्ज, बँक पासबुक, आधारकार्ड, रेशन कार्ड, संजय गांधी योजनेचा लाभार्थी असल्यास दिव्यांगाचे प्रमाणपत्र/ मृत्युप्रमाणपत्र / दुर्धर आजारबाबतचे प्रमाणपत्र / परीत्यक्त्या असल्याबाबतचा न्यायलयाचा पुरावा.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQ>L>S>cXD6JuXDvDHw$2H$Eg7D4GYZjaEeDMD-VfS>KgueXyr3hjP_rbA/viewform ‘ा संकेतस्थळावर स्वतः तलाठी यांचे मार्फत तहसिल कार्यालय संगायो विभाग बीड येथे माहिती भरावी, असे तहसील कार्यालय यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भात रविवारी शिवसेनेची जिल्हा बैठक : जगताप, मुळूक, गलधर




बीड (प्रतिनिधी) बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. या संदर्भात रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक सकाळी अकरा वाजता हॉटेल ग्रॅड यशोदा येथे आयोजित करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणा–या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी बीड जिल्हा शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल ग्रॅण्ड यशोदा येथे आयोजित केली आहे. बैठकीस जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी महिला आघाडी युवासेना शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटना आजी–माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळ महाराष्ट्र सचिव सलीम सारंग साहेब यांचा वाढदिवस नवी मुंबई येथे साजरा करून शुभेच्छा देताना सोबत रमीज शेख( कार्य अध्यक्ष अल्पसंख्याक आघाडी बीड) शेख नवीद( बीड शहराध्यक्ष अल्पसंख्याक) आघाडीचे नदीम शेख ,सोहेल पटेल.**

# राज्यात २७-२८ डिसेंबरदरम्यान गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

## खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनीहवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

मुंबई, दि. २५ : २७–२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. २७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे. २८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.

२९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# गावातील प्रश्न गावातच मिटवा : चाकरवाडी, पांढ-याची वाडी येथे तहसीलदार शेळके यांचे गावक-यांना आवाहन

शुक्रवार २७ डिसेंबर लोक इच्छा प्रतिनिधी रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , येळंबघाटच्या मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांनी पांढ–याचीवाडी , चाकरवाडी येथे विविध कामासाठी भेट दिली .

पांढ–याची वाडी येथे शेतीच्या वादासंदर्भात तहसीलदार शेळके यांनी दुपारी ११ च्या सुमारास भेट दिली . वादी, प्रतिवादी व पंच यांच्या समक्ष पाहणी केली . रीतसर पंचनामा करून घेतला . सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतले व सर्व क्षेत्राची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली .

त्यांनतर श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे जाऊन संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादांचे समाधीस्थळी जाऊन दर्शन घेतले . या ठिकाणचा परिसर पाहून मनाला शांती लाभते असे यावेळी तहसीलदार शेळके यांनी नमूद केले .

त्यानंतर चाकरवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेस तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गावक–यांसह भेट दिली . सुरुवातीस पोषण आहाराबाबत माहिती घेतली . पोषण आहार कुठे शिजवला जातो त्या जागेची पाहणी केली . त्या ठिकाणी खिचडी शिजवत असल्याचे त्यांनी पाहिले . त्या खिचडीत काय काय टाकले आहे , तेल कोणते वापरले आहे , याबाबत सविस्तर माहिती घेतली . विद्यार्थ्यांना पोषक आहार दिला गेला पाहिजे , त्यात कोणीही हयगय करता कामा नये , अशा सूचना यावेळी दिल्या . यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की विद्यार्थी हे समाजाचे व देशाचे भावी नागरिक आहेत . त्यांना ज्ञानार्जन करताना ज्याप्रमाणे आपण उत्कृष्ट पद्धतीने शिकविले पाहिजे यावर लक्ष देतो , त्याच प्रकारे त्यांना सकस आहार मिळेल यासाठी मुख्याध्यापक , शिक्षकांसह गावक–यांनी सुद्धा काळजी घेतली पाहिजे .

त्यानंतर तहसीलदार शेळके यांच्या हस्ते पर्यावरण पूरक अश्या झाडांचे शाळेच्या आवरात वृक्षारोपण करण्यात आले . यावेळी ग्राम महसूल अधिकारी अमोल अधापुरे यांनी शाळेतील शिक्षक , गावकरी , विद्यार्थी यांच्याशी परिचय करून दिला . तसेच विद्यार्थ्यांना सांगितले की तुम्ही सुद्धा भरपूर अभ्यास करा . संघ लोकसेवा आयोग , राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा द्या . मोठ्या पदावर अधिकारी म्हणून विराजमान व्हा . ज्यांच्या अंगी कला कौशल्य आहे , त्यांनी त्या त्या क्षेत्रात आपले करिअर घडवा .

वृक्षारोपण केल्यानंतर तहसीलदार शेळके यांना लहान चिमुकल्यांसोबत फोटो काढण्याचा मोह आवरता आला नाही . त्यांनी शाळेच्या परसबागेची पाहणी केली . शाळेतील शिक्षिका लता ससाने यांनी माहिती दिली की या परसबागेत आम्ही वांगे , बटाटे, लसूण , कांदे लावतो . त्यांची काळजी घेतो आणि याच परसबागेतून निघणारे वांगे, बटाटे , कांदे विद्यार्थ्यांना दुपारचा पोषण आहार दिल्या जातो , त्यात वापरतो . त्यामुळे बाहेरून भाजीपाला आणण्याची गरज भासत नाही . ताजा भाजीपाला आम्ही इथे वापरू शकतो . त्यांनतर तहसीलदार शेळके यांनी नवीन



वर्गखोल्यांचे सुरु असलेल्या बांधकामाची पाहणी केली .

त्यानंतर ई पीक पाहणी करण्यासाठी गावक–यांसह तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी हे सर्व जण चाकरवाडी येथील शेतकरी प्रकाश डोईफोडे , सर्व्हे क्रमांक ९३३ / आ यांच्या शेतात पोहोचले . शेतक–यांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन मार्गदर्शन केले . याठिकाणी मंडळ अधिकारी दीपाली आघाव यांनी ई पीक पाहण्याची प्रक्रिया याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली . यावेळी अधिकची माहिती त्यांनी नमूद केले की ई पीक पाहणी करत असताना तंतोतंत जिओ फेन्सिंगच्या माध्यमातून होणार असल्यामुळे शेतक–यांना स्वतः च्या गटांमध्ये उभे राहूनच ई पाहणी करावी लागणार आहे . अशा प्रकारची ई पिक पाहणी केल्यानंतर त्यातील १०% ई पिक पाहणी ही ग्राम महसूल अधिकारी यांच्या माध्यमातून तपासली जाणार आहे . तहसीलदार शेळके यांनी स्वतः महादेव डोईफोडे शेतक–याची मोबाईल ॲपवर ई पीक पाहणी करून दिली . उपस्थित शेतक–यांशी संवाद साधला . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले . सर्व ग्राम महसूल अधिकारी यांच्या वतीने बोलताना मंडळ अधिकारी दीपाली आघाव यांनी आश्वासन दिले की मंडळातील नागरिकांची अथवा शेतक–यांची कोणतीही कामे , रस्त्याची कामे अथवा इतर कामे प्रलंबित राहणार नाहीत याबाबत पूर्णतः दक्षता घेण्यात येईल .

या दौ–यावेळी तहसीलदार यांचेसमवेत मंडळ अधिकारी दिपाली आघाव , ग्राम महसूल अधिकारी अमोल अधापुरे , स्वाती घुगे , अक्षय चव्हाण , शिक्षिका लता ससाणे , पोलीस पाटील नानासाहेब काकडे , रेखा पवळे ,धम्मदिप वंजारे , गणेश माने ,राजेश कवडे ,दत्ता मोरे ,किशोर मोरे , वैभव मोरे , सखाराम आणवने , श्रीमंत मोरे , प्रकाश डोईफोडे , चंद्रसेन माने , सखाराम सस्ते , प्रशांत डोईफोडे व शेतकरी उपस्थित होते.

तहसीलदार यांनी स्वतः गावात येऊन शाळेला भेट देणे , गावक–यांची प्रत्यक्ष संपर्क साधणे , यामुळे गावक–यांना आणि विद्यार्थ्यांना यांना मनस्वी आनंद झाल्याचे दिसून आले .अशाप्रकारे तहसीलदार दर्जाचे अधिकारी गावक–यांची बोलत असतील , त्यांच्या अडचणी समजून घेत असतील तर शासनाचे आभार मानले पाहिजे , असे यावेळी गावक–यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले .

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २८ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## सरपंच देशमुख हत्या प्रकरणामुळे माजलगावात दर्पण दिनाचा कार्यक्रम साध्या पध्दतीने होणार

माजलगाव-प्रतिनिधी जिल्ह्यामध्ये सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण हत्या झाली. हे कुटूंब उघड्यावर पडले असुन माजलगाव पत्रकारसंघाच्या वतीने या घटनेचा निषेध करत यावर्षी होणारा दर्पण दिनाचा कार्यक्रम साध्या पध्दतीने शासकीय विश्रामगृह येथे आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून साजरा करण्यात येणार असल्याचा निर्णय माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आला आहे. येथील शासकीय विश्रामगृहावर पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते ६ जानेवारीला होणारा दर्पण दिनाचा कार्यक्रम प्रतिवर्षाप्रमाणे मोठ्या पध्दतीने व दर्पण पुरस्कारासह विवीध पुरस्कार देउन न करण्याचा निर्णय घेण्यात आला. सामाजिक दायित्व निभावत माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या पुढाकारातुन कायमच समाजातील विवीध घटकांना पुरस्कार देउन गौरविण्यात येत असत परंतु यावर्षी जिल्ह्यामध्ये झालेली सरपंच संतोष देशमुख यांची हत्या या घटनेमुळे अत्यंत साध्या पध्दतीने बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशमुख कुटूंबीयांना माजलगाव तालुका पत्रकार संघ व आ. प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातुन विवीध संघटना व समाजातील दानशुर व्यक्तींनी केलेली आर्थिक मदत ४ जानेवारीला मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना देण्यात येणार आहे. ६ जानेवारीचा दर्पण दिनाचा कार्यक्रम हा शासकीय विश्रामगृह याठिकाणी होणार असुन सर्व पत्रकार बांधव व आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत साध्या पध्दतीने होणारा

# बीडमध्ये मोठ्या घडामोडी, वाल्मिक कराडच्या पत्नीची CID चौकशी,

## २ बॉडीगार्ड आणि राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षाचीदेखील कसून चौकशी

**बीड,/प्रतिनिधी**

बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. या घटनेतील संशयित फरार आरोपी वाल्मिक कराड यांचा सीआयडी आणि पोलिसांकडून शोध सुरु आहे. पण वाल्मिक कराड अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. यानंतर आता सीआयडी चांगल्याच ॲक्शन मोडमध्ये आली आहे. सीआयडीने आज वाल्मिक कराड यांच्या पत्नी मंजिली कराड यांना चौकशीसाठी बोलावलं. त्यांची कसून चौकशी करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांची देखील सीयआडीकडून चौकशी सुरु असल्याची माहिती मिळत आहे. याशिवाय वाल्मिक कराड यांच्या दोन अंगरक्षकांची देखील सीआयडीकडून चौकशी सुरु



असल्याची माहिती मिळत आहे. सीआयडीने मंजिली कराड यांना चौकशीनंतर सोडून दिलं आहे. पण सध्या कराड यांचे अंगरक्षक आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांची चौकशी सुरु आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाला १८ दिवस झाले आहेत. पण अद्यापही या प्रकरणातील ३ आरोपी हे फरार आहेत. पोलीस, सीआयडीचे पथक अपार परिश्रम घेत आहेत, पण तरीही आरोपींचा शोध लागलेला नाही. त्यामुळे सीआयडीचे अप्पर पोलीस महासंचालक बीडमध्ये तळ ठोकून आहेत. सीआयडीचे जिल्हा पोलीस अधीक्षक सचिन पाटील हे देखील बीड शहर पोलीस ठाण्यात आज आले होते. यावेळी वाल्मिक कराड यांच्या पत्नीची जवळपास ४० मिनिटे चौकशी झाली आहे. त्यानंतर राजेश्वर चव्हाण आणि कराड यांच्या दोन अंगरक्षकांची चौकशी घेणं सुरु आहे. राजेश्वर आणि अंगरक्षक हे वाल्मिक कराड यांच्या संपर्कात आहेत का, त्यांच्याविषयी काही माहिती आहे का? याबाबतची माहिती सीआयडीकडून घेतली जात आहे.

### सुरेश धस यांचे धक्कादायक आरोप

बीडच्या घटनेवर भाजप आमदार सुरेश धस यांनी धक्कादायक दावे केले आहेत. बीडच्या सगळ्या प्रकरणांमध्ये आकाचा हात आहे. तो आका आता कुठे आहे, काय करतो याची सर्व माहिती आपण नव्या पोलीस अधीक्षकांना दिल्याचं सुरेश धस यांनी सांगितलं. बीडमध्ये महादेव बेटिंग ॲप प्रकरणाचा मोठा घोटाळा झाल्याचा दावा धस यांनी केला. एकाच व्यक्तीच्या नावाने ९ अब्ज रुपयांपर्यंत व्यवहार झाले, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे. तसेच एका पीआयला सर्व माहिती असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच आपण याबाबत उद्या पूर्ण फाईल दाखवून पुराव्यासह खुलासा करणार असल्याचा इशारा सुरेश धस यांनी दिला आहे.

# के.एस.पी.विद्यालय येथील साने गुरुजी जयंती उत्साहात संपन्न




बीड-प्रतिनिधी दि.२४/१२/२०२४ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील साने गुरुजी पांडुरंग सदाशिव साने यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम मान्यवराच्या हस्ते साने गुरुजीच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आला. यावेळी मुलांना साने गुरुचीच्या कार्या बदल अवगत करण्यात आले. साने गुरुजींनी कादंबरी, कथा, बालसाहित्य, कविता, निबंध, चरित्र अशा साहित्य प्रकार त्यांनी लिहीले. मनोरंजनाबरोबरच मुलांवर उत्तम नैतिक संस्कार व्हावेत, हे त्यांचे उद्दिष्ट होते. श्यामची आई हे त्यांचे आत्मकथनपर पुस्तक विशेष गाजले. या पुस्तकावरून आचार्य अत्रे यांनी श्यामची आई हा चित्रपट काढला. त्याला उत्कृष्ट चित्रपट निर्मितीचा स्वतंत्र भारतातील पहिला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. या बदल मुलांना सांगण्यात आले. या कार्यक्रमास श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## एफर्ट इंग्लिश स्कूल, किटिआडगाव- वार्षिक पालक मेळावा उत्साहात संपन्न



माजलगाव-प्रतिनिधी तालुक्यातील किती आडगाव येथिल एफर्ट इंग्लिश स्कूलचा वार्षिक पालक मेळावा २५ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांचे स्टॉल लावून विक्री करत व्यावहारिक ज्ञान प्राप्त केले. ङ्गआनंद नगरीफ या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांची प्रात्यक्षिके सादर केली, ज्यामुळे त्यांना व्यावसायिकता आणि जीवन कौशल्ये शिकता आली. कार्यक्रमाच्या प्रारंभात किटिआडगावचे सरपंच मा. रुक्मानंद खेत्रे, माजी सरपंच मा. बाबा नाना आगे, तसेच प्रमुख पाहुणे कविवर्य मा. मोहन राठोड सर, मा.बालाप्रसाद चव्हाण सर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शिका मा.संजीवणी ताई राऊत यांनी पालकांना मार्गदर्शन केले आणि त्यांना समाजातील विविध भूमिकांसाठी प्रेरित केले. शाळेचे संचालक मा. श्री. कैलास वाव्हळकर सर यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांनी शाळेच्या प्रगतीचा अहवाल सादर करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिक विकासावर जोर दिला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थित म्हणून मा. सुभाष बोराडे सर आणि मा. अँड.रविकांत उघडे सर यांनी आपले मार्गदर्शन केले. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनिता वाव्हळकर मॅडम यांनी अभार प्रदर्शन केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. भगवान ससाने यांनी केले, तर शाळेच्या सहशिक्षिका सौ. पुजा काळे मॅडम आणि रेणुका वाघमारे मॅडम यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. यावर्षीच्या पालक मेळाव्याने शाळेच्या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांची गोडी वाढवली असून, विद्यार्थ्यांना जीवनाच्या विविध पैलूंवर काम करण्याची अनोखी संधी दिली

## बीडचे पालकमंत्रिपद अजितदादांनी घ्यावं, म्हणजे अंधारात कोण काय करतंय हे समजेल-खा.बजरंग सोनवणे



बीड। प्रतिनिधी जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात तपास सीआयडीकडे सोपवून काही फरक पडणार नाही, असं खासदार बजरंग सोनवणेंनी म्हटलंय. मागील सरकारमध्ये धनंजय मुंडेंकडे पालकमंत्रिपद दिल्याने कायदा सुव्यवस्था ढासळली, असा आरोपही त्यांनी केला. बीडमध्ये नेमकं काय सुरू आहे याची माहिती घ्यायची असेल तर अजित पवारांनी बीडचं पालकत्व स्वीकारावं अशी मागणी बजरंग सोनवणे यांनी केली. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना पकडण्याचे आश्वासन पोलिसांकडून दिले जाते. मात्र प्रत्यक्षात कारवाई होत नाही. गेल्या बऱ्याच दिवसांपासून या प्रकरणात वेगवेगळी वक्तव्यं येतात. मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की आरोपींना शिक्षा करू. पण तसं काहीही होताना दिसत नाही. या प्रकरणाचा तपास पुढे जात नाही. मी पहिल्या दिवसांपासून सीबीआय तपासाची मागणी करतोय. असे देखील यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाल

## या घटनेच्या आडून मला सामाजिक व राजकीय आयुष्यातून उठवायचा डाव-धनंजय मुंडे

मुंबई-प्रतिनिधी मसाजोगचे तरुण सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना व त्यांचे जे कोणी सूत्रधार असतील त्यांना फाशीच दिली जावी, ही माझी पहिल्या दिवसापासून ची मागणी असून या प्रकरणातील तपास पूर्ण करून तातडीने याची चार्ज शीट दाखल करून हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवले जावे व देशमुख यांच्या कुटुंबीयांना लवकरात लवकर न्याय मिळवून दिला जावा ही माझी पहिल्या दिवसापासून ची मागणी आहे असे मत अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मुंबई येथे माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे. धनंजय मुंडे यांनी आज अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण मंत्रालयाचा पदभार स्वीकारत विभागाचा आढावा घेतला. सह्याद्री अतिथी गृह येथे संपन्न झालेल्या या आढावा बैठकीनंतर धनंजय मुंडे माध्यमंशी बोलत होते. बीड जिल्ह्यातील एका तरुण सरपंचाची हत्या झाली, हे प्रकरण अत्यंत दुर्दैवी आणि तितकेच भयानक आहे, त्यामुळे यातील कुठल्याही आरोपीचे, तो कुणाच्याही जवळचा असला तरी समर्थन केले जाऊ शकत नाही, त्यामुळे सरकार म्हणून या प्रकरणांमध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही तसेच या प्रकरणाची पाळेमुळे शोधून काढण्याच्या दृष्टीने पोलिसांचा तपास वेगाने सुरू असल्याचेही धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना धनंजय मुंडे म्हणाले की या घटनेच्या आडून बीड जिल्ह्यामध्ये अनेक जणांकडून वेगळ्या पद्धतीचे राजकारण केले जात आहे. मला मंत्री पद मिळू नये, पालकमंत्री पद मिळू नये, यासाठी या घटनेचे दुर्दैवी राजकारण केले गेले व यातून माझी प्रतिमा मलिन करण्याचा प्रकार सातत्याने सुरू आहे. काही जणांचा तर दिवसच माझ्यावर टीका करण्यात व या घटनेशी कसलाही संबंध नसताना तो जोडायचा प्रयत्न करण्यात उजडतो आहे. या घटनेच्या आडून मला सामाजिक व राजकीय आयुष्यातून उठण्याचा काही जणांचा डाव आहे मात्र, ही घटना दुर्दैवी असून त्यातील आरोपींना फाशी मिळावी व खरे सूत्रधार समोर यावेत ही माझी भूमिका आहे व ती पहिल्या दिवसापासून स्पष्ट आहे. त्यामुळे ज्यांना आरोप करायचे आहेत त्यांना करू द्या, अखेर घटनेतील सत्य व सूत्रधार समोर येईलच, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले आहे.

# अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने पारदर्शकता आणि जबाबदारीने काम करावे-मंत्री धनंजय मुंडे

## स्मार्ट शिधापत्रिका आणि आधुनिक गोदाम व्यवस्थेला प्राथमिकता देणार; पदभार स्वीकारत धनंजय मुंडेंनी घेतला विभागाचा आढावा

मुंबई-प्रतिनिधी अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे सेवा देण्याचे अत्यंत महत्वाचे काम आहे. प्रामाणिकता, पारदर्शकता आणि अकाउंटिबीलिटी या त्रिसूत्रीचा अवलंब करून विभागात चांगले करावे, सर्व सामान्य नागरिकांच्या रोजच्या जगन्याशी या विभागाचा संबंध आहे त्यामुळे अधिक पारदर्शकपणे आणि जास्त जबाबदारीने काम करावे अशा सूचना अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्या. स्मार्ट शिधापत्रिका आणि आधुनिक गोदाम व्यवस्था याला प्राथमिकता देणार



असल्याचेही धनंजय मुंडेंनी यावेळी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे आज मंत्री श्री मुंडे यांनी अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचा सविस्तर आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार करत असताना विभागाचे डीजीटायजेशन , आधुनिक गोदाम व्यवस्था याचा अंतर्भाव करण्याच्या सूचना देऊन मंत्री श्री मुंडे म्हणाले की, विभागाच्या कामकाजामध्ये आणखी सुधारणा करावी, धान्य खरेदी ते धान्य वितरण या प्रत्येक टप्प्यावर त्याची अद्ययावत माहिती घेणारी यंत्रणा निर्माण करावी., धान्याचे वितरण जलद होण्यासाठी एक गाव एक गोदाम ही योजना तातडीने कार्यान्वित करावी, स्मार्ट गोदाम उभारण्यात यावीत, वितरण व्यवस्था सुधारल्यामुळे होणारे नुकसान कमी होऊन ग्राहकांचा आणि लाभार्थ्यांना फायदा होईल, लाभार्थ्यांना स्मार्ट शिधा पत्रिका वितरण करण्याची कार्यवाही सुरू करावी, धान्य खरेदी ही विकेंद्रित करण्यासाठी प्रस्ताव तयार करावा तसेच जास्तीत जास्त गोदामांची उभारणी करण्यात यावी अशा सूचना त्यांनी दिल्या. मंत्री श्री मुंडे पुढे म्हणाले की, ग्राहक संरक्षण आणि धान्य वितरण यासाठी डिजिटल डॅश बोर्ड विकसित करावा, ग्राहक संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी त्यामध्ये शाळा, महाविद्यालय यांना सहभागी करून घ्यावे, लाभार्थ्यांना सुलभ आणि त्वरित तक्रार निवारण होईल अशा प्रकारची यंत्रणा निर्माण करावी. बैठकीस अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, सहसचिव रामचंद्र धनावडे, उपसचिव राजश्री सारंग, संतोष गायकवाड यांच्यासह, विभागाचे अवर सचिव व अधिकारी उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com